पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 19/03/2020 (गुरूवार)
(दुपार)

---

## माहुरझरी शिवारातील अवैध मोहाफुलाची गावठी दारू गाळणाऱ्या अड्डयांवर कळमेश्वर पोलीसांची धाड

दिनांक 18/03/2020 रोजी कळमेश्वर पोलीस स्टेशन चे डी.बी. पथकाचे पोहवा. मन्नान नौरंगाबादे व पोशि. रवि मेश्राम पोस्टे. परीसरात गस्त करीत असतांना त्यांना पोलीस मित्राव्दारे माहिती मिळाली की, माहुरझरी शिवारात खदान भागात गोपाल शर्मा यांचे तलावाचे काठाने मोठ्या प्रमाणात सिन्टेक्स टाकीत मोहाफुलाचा रसायण सडवा भरलेला असुन दारू गाळण्याचे साहीत्य ड्रम, पींप, डबकी ईत्यादी सामान त्या ठिकाणी ठेवलेले आहे. त्यावरून पोलीसांनी सापळा रचुन आरोपी नामे– 1) तुळशीराम दामाजी वरघने, वय 55 वर्ष 2) शोभा तुळशीराम वरघने, वय 55 वर्ष दोन्ही रा. फ्रेन्डस कॉलोनी, नागपुर, ह.मु. माहुरझरी शिवार यांना अटक केली. सदर ठिकाणी दोन्ही आरोपी हे भट्टया लावुन गावठी मोहाफुल दारू गाळीत होते. सदर कारवाईत पोलीसांनी मोहाफुल रसायन सडवा 8000 लीटर, मोहाफुल गावठी दारू 40 लिटर मोहाफुल तसेच दहा लोखंडी जुनाट काळे भट्टी गाळण्याचे ड्रम, असंख्य नेवार पट्या भट्टी गाळण्यासाठी तसेच पाण्याकरीता एक शार्प मायक्रो कंपनीची पानबुडी इलेक्ट्रीक मोटर, प्लॅस्टीक पाईप असा दारू गाळण्याचे साहित्य असा एकुण 16,25,800/–रूपये चा माल मोक्यावर जप्त करून मोहाफुल रसायन सडवा व मोहाफुल गावठी दारू मोक्यावर नाश करून आरोपीना पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे दोन्ही आरोपी विरूदध अप. क्र. 214/2020 कलम 65 ई, फ, क, ब महाराष्ट्र दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोहवा. मन्नान नौरंगाबादे ब.न. 104 हे करित आहे.

सदरची कार्यवाही श्री. राकेश ओला, पोलीस अधिक्षक, जिल्हा नागपूर (ग्रामिण), श्रीमती मोनिका राऊत, अपर पोलीस अधिक्षक, जिल्हा नागपूर (ग्रामिण), उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अशोक सरंबळकर यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. जगदिश गायकवाड ठाणेदार कळमेश्वर यांचे मार्गदर्शनाखाली पोहवा. मन्नान नौरंगाबादे, जयप्रकाश, राजकुमार राऊत, चालक पोना. रविन्द्र, रवि मेश्राम, ललीत ऊइके, ज्योती यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.





पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर